शताब्दी वर्ष इ. स. २०२२ ते इ. स. २०२३

Centenary Year 2022 - 2023

# सद्भक्तांना आवाहन

सद्भक्ति पंथाचे

प्रस्थापक



श्री शंकर व्यंकटेश टाकी
उर्फ श्री बाबा

प्रसारक



श्री मंगेश रामचंद्र टाकी
उर्फ श्री दादाभाई

प्रवर्तक



श्री रामचंद्र शंकर टाकी
उर्फ श्री भाई

www.sadbhaktimandir.com

www.facebook.com/SadbhaktiMandir

## ॐ श्रीसद्गुरुभ्योनमः !

**नमस्ते.**

**प. पु. श्रीभाईंनी (श्री रामचंद्र शंकर टाकी, अर्थात, श्री टाकी महाराज, २ रे) इ. स. १९२२ सालातील विजया दशमीच्या सुमुहूर्तावर सद्भक्ति प्रसारक मंडळी ह्या न्यासाची (ट्रस्टची) स्थापना केली.** दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी, म्हणजे गेल्या वर्षीच्या विजयादशमीस ह्या संस्थेला ९९ वर्षे पूर्ण होऊन शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. ह्या ९९ वर्षातील संस्थेची यशस्वी वाटचाल केवळ श्रीगुरुकृपेमुळे आहे ह्याची जाणीव सर्व विश्वस्तांना आहे आणि श्रीगुरुंची अशीच अखंड कृपादृष्टी सद्भक्ति मंदिरावर आणि समस्त भक्तजनांवर राहो, अशी त्यांचे चरणी प्रार्थना आहे.

सद्भक्ति मंदिर ही वास्तू प. पु. श्रीभाईंनी इ. स. १९२३ साली बांधली. ह्या वास्तूच्या पवित्रतेचे किंवा ह्या वास्तूला मंदिर हा दर्जा लाभण्याचे कारण म्हणजे प्रत्यक्ष **श्रीदत्तगुरुंनी आद्य सद्गुरू श्री नारायण महाराज जालवणकर ह्यांना दिलेल्या आत्मलिंग पादुका आणि श्रीदत्तगुरुंची पंचधातूची अप्रतिम सुंदर मूर्ती.** सदर पादुका ह्या श्रीदत्तगुरुंच्या चरणांशी स्थित आहेत आणि सद्भक्ति मंदिर व आजूबाजूचा परिसर चैतन्यमय करीत आहेत.

**ह्या वर्षीच्या विजया दशमीच्या दिवशी, म्हणजे दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी, सद्भक्ति मंदिर शंभराव्या वर्षात पदार्पण करेल.** त्या निमित्ताने ह्या दिवसापासून पुढील वर्षभर, अर्थात इ. स. २०२३ च्या विजया दशमी पर्यंत **शताब्दी वर्ष साजरे करण्याची प्रेरणा श्रीगुरुंनी दिली आहे.** त्या निमित्ताने वर्षभर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्याचे योजिले आहे. श्रीगुरुंचीच प्रेरणा असल्यामुळे शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यास त्यांचेच मार्गदर्शन लाभून सर्व कार्यक्रम यशस्वी होतील अशी खात्री आहे.

शताब्दी वर्ष साजरे करण्या संबंधी विश्वस्त मंडळी नियोजन करीत आहेत. [ ढोबळ रूपरेषा पुढे दिलेली आहे.]

सद्भक्ति मंदिर ह्या वास्तूला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत म्हटल्यावर ह्या इमारतीत दुरुस्ती, डागडुजी करण्याची नितांत आवश्यकता आहे. बांधकामाच्या संदर्भातील कामे, इलेक्ट्रीकल कामे, प्लम्बिंग, रंगरंगोटी इत्यादी गोष्टी विचाराधीन आहेत आणि ही सर्व कामे करणे अत्यंत गरजेचे आहे. ह्या सर्व कार्याकरिता बऱ्यापैकी खर्च होणार ह्याची जाणीव आहे. **अंदाजे २५ लाख रुपये इतका खर्च येईल असे अनुमान आहे.** ह्या पूर्वीचा अनुभव असा आहे की जेव्हा जेव्हा सद्भक्ति मंदिराकरिता काही आर्थिक गरज उत्पन्न झाल्यास आवश्यक तितका निधी श्रीगुरुकृपेने आपोआपच आणि योग्य वेळी उभा राहात असे. ह्या खेपेस देखील सद्भक्त सढळ हस्ते मदत करतील अशी खात्री आहे.

ईश्वरी संकल्प तो स्वतः: परमेश्वरच पूर्ण करून घेतो. आपण केवळ निमित्तमात्र आहोत. तरी जेव्हां श्रीगुरूंच्या प्रेरणेनेच हा शताब्दीवर्ष सोहळा साजरा करण्याचे योजिले आहे, तेव्हां हा ईश्वरी संकल्प पूर्ण करण्याकरिता चहूबाजूंनी मदतीचे हात पुढे येतील ही खात्री आहे. सद्गुरू सेवेची ही एक उत्तम संधी आपल्याला लाभली आहे. भाग्यवान सद्भक्त, श्रीदत्तगुरुंच्या प्रेरणेने यथायोग्य अशी धनराशी श्रीगुरूंच्या चरणी अर्पून ह्या संधीचे सोने करून घेतील असा आम्हा सेवकांना विश्वास आहे.

**ॐ श्रीगुरुदेवदत्त !**

## प्रायोजित कार्यक्रमांची ढोबळ रूपरेषा : -

सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, वादन, नर्तन इत्यादी सादर करण्या करिता देशभरातील नामवंत कलाकारांना पाचारण करण्याविषयी विचार विनिमय चालू आहे. सामाजिक उपक्रमात, श्रीभगवद्गीता, श्रीरामरक्षा आणि श्रीहनुमानचालीसा ह्यांचे शालेय विद्यार्थ्यांकडून पाठान्तर करून घेऊन एक स्पर्धा आयोजित केली जाईल. विजेत्यांना श्री टाकी महाराजांच्या नावे योग्य ती पारितोषिके दिली जातील. जे विजेते नाहीत पण ज्यांनी स्पर्धेत भाग घेतला आहे अश्या स्पर्धकांना उत्तेजनार्थ सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे स्मृतिचिन्हे दिली जातील.

सद्भक्ती ग्रंथालय आणि वाचनालय सुरु करण्याचा मंडळींचा मनोदय आहे आणि त्या दिशेने पावले टाकायला सुरुवात झालेली आहे. धार्मिक कार्यक्रमात मुख्यतः महाराष्ट्रातील नावाजलेल्या कीर्तनकारांचे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील.

प. पु. श्री भाईंचे मराठी, इंग्रजी आणि चक्क लॅटिन ह्या भाषांवर प्रभुत्व होते. पण संस्कृत भाषेकडे ते आकृष्ट होऊन ती भाषा आत्मसात करण्याची त्यांना जबर आस लागली आणि पुढे श्री मंगेशाच्या कृपेने त्यांची त्या काळातील देशातील सर्वोत्तम संस्कृत विद्वान माननीय पंडित श्री फोंडूशास्त्री सुखटणकर ह्यांची गोव्याच्या त्या पवित्र भूमीत गाठ पडून प. पु. भाईंनी संस्कृत भाषेवरदेखील कसे प्रभुत्व मिळविले ह्या विषयीचा वृत्तांत आपण त्यांच्या चरित्रात वाचलाच आहे. प. पु. श्री भाईंचा संस्कृत भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन संस्कृत भाषेचा प्रसार होण्याकरिता संस्कृतप्रबोध वर्ग सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे नियमितपणे आयोजित केले जातील.

## संपर्क : - (दूरभ्रमण क्र.)

१. श्री विवेक ताम्हाणे - ९८२०३५०८६७

२. श्री समीर रायकर - ९८२००८४०३०

३. श्री गौतम मुरकुंडे - ९९२०५५११३४

४. ॲड. शैलेश दळवी - ९८२०४५१७००

५. श्री रोहन दळवी - ९८६७४९४७४७

६. श्री अरुण विजयकर - ९२२३२२२२४५